ijindex
digital directory of indian journals

ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)

# Excel's International Journal of Social Science & Humanities

An International Peer Reviewed Journal

February - 2021
Vol. I No. 15

Part - II

## Importance of Research in the Development of India

Issue Editor
**Dr. Laxman K. Ulgade**
Head of Public Administration Dept.
Havagiswami College, Udgir

Issue Editor
**Dr. Nandkumar N. Kumbharikar**
Public Administration Dept.
SPP College, Sirsala, Dist. Beed

EXCEL PUBLICATION HOUSE
AURANGABAD

| | | | |
|---|---|---|---|
| 16 | प्रा.डॉ.अशोक कानडे | सिंधू संस्कृती : समृध्द कलेचा प्राचीन वारसा | 74 |
| 17 | डॉ.अमित रामलिंग कवठाळे | सामाजिक संशोधनात सर्वेक्षण पद्धतीचे महत्त्व | 76 |
| 18 | प्रा.डॉ.लोखंडे बी.बी. | नवीन शैक्षणिक धोरण उच्च शिक्षणासाठी काल सुसंगत | 80 |
| 19 | डॉ. बाळासाहेब निर्मळ | भारतीय रोजगार निर्मितीमध्ये सार्वजनिक उपक्रमांचे योगदान | 82 |
| 20 | प्रा. डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे | महान समाजसुधारक महात्मा बसवेश्वरांचे कार्य | 87 |
| 21 | डॉ. रायठक दिपमाला | कौटूंबिक, औद्योगिक समस्या | 91 |
| 22 | डॉ. सांगळे भगवान | ग्रामीण विकास प्रषासनाचे पर्यावरण | 94 |
| 23 | प्रा.डॉ. सवाई एम. के. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक विचारसरणी व कार्य | 99 |
| 24 | सौ. सुनिता रंगारी | मराठी काव्यातून उमटलेली शेतकरी समस्या : एक वेध | 101 |
| 25 | डॉ. मुक्ता सोमवंशी | "स्वच्छ भारत अभियान -एक चिकित्सक अभ्यास" विशेष संदर्भ सोनपेठ तालुका | 106 |
| 26 | प्रा.शिवकुमार उस्तुर्गे | स्त्री-भ्रूण हत्या : एक सामाजिक समस्या | 110 |
| 27 | प्रा.अरूणा वाळके | महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये मोबाईलचा वापर : एक अभ्यास संदर्भ : श्री पं.पा. महाविद्यालय, सिरसाळा | 113 |
| 28 | प्राचार्य डॉ. पुष्पा तायडे | बहुराष्ट्रीय कंपन्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर प्रभाव | 116 |
| 29 | डॉ.एन.एन. कुंभारीकर | सुशासन : एक आदर्श प्रशासकीय व्यवस्था | 124 |
| 30 | डॉ.दाडगे सुरेखा | नवीन कृषी कायदे २०२० : आपेक्षा आणि फायदे व तोटे | 126 |

# कौटूंबिक, औद्योगिक समस्या

प्रा.डॉ.सौ.रायठक दिपमाला विश्वनाथ
समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्री संत जनाबाई शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय. ता.गंगाखेड

**प्रस्तावना :**

पृथ्वीच्या लाखो वर्षाच्या इतिहासात मानवी समाजाला फक्त पाच हजार वर्षाचाच किंवा सिंधू संस्कृती पर्यंतचा इतिहास माहित आहे. मानवाने काळानुसार व गरजेनुसार धर्मांची, सामाजिक संस्थांची, परंपरा व संस्कृतीची निर्मिती केली. मानवाने आपले आस्तिव कायम ठेवण्यासाठी गरजेनुसार स्वतः मध्ये बदल करुन घेतला . निसर्गातील अनेक घटकांशी संघर्ष करुन जीवन जगण्याची कला अवगत केली. मानवी इतिहासात स्त्री – पुरुषांचा इतिहास रामहर्षक आहे. अनादी अनंत प्रवासात स्त्री –पूरुषाचे कुटूंबातील स्थान काय होते, काय आहे आणि काय राहील.

मानवाने अनेक समस्यावर मात करण्यांसाठी प्रथम समुह तयार केलेव त्या समुहातुनच त्याने नैसर्गिक गरज पूर्ण करण्यासाठी कुटूंबाची निर्मीती केली. या कुटूंबातील व्यक्तीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी शेती व शेतीशी संबंधीत काम, धंदे सुरु केले, शेती सोबत जोड व्यवसाय म्हणून पाळीव प्राण्यांचे पालन – पोषण सुरु केले. समाजात कुंटुंब आणि उद्योग यांचा अगदी संयुक्त्रीक संबध आहे. हे दोन्ही घटक एकमेकाना पूरक असे आहेत. कुंटुंबात उद्योगाचे महत्व काळानुरुप बदलत गेले आहे. पण कोणताही अभ्यास पूर्ण करण्यासाठी त्याला कोणतया तरी एका बंधात बांधने आवश्यक आहे. हे बंध म्हणजे अभ्यासाचा निश्चित आराखडा असतो. तो आराखडा खालील प्रमाणे :–

**शोध निबंधची उद्दिष्टये:**

1) कुंटुंबाची निर्मिती अभ्यासणे.
2) मानवी गरजांच्या पूर्ततेसाठी उद्योग निर्मितीचा शोध घेणे.
3) औद्योगीकरनाने कौंटूबिक समस्यात होणारी वाढ अभ्यासणे.

**कुंटूंबाची निर्मिती :**

कोट्यावधी वर्षापूर्वी ज्यावेळी निसर्गात सजीव सृष्टी आस्तीत्वात आली त्यावेळी दोनच वंश जन्मास झाली. ती म्हणजे नर (पु–लिंगी) आणि मादी (स्त्रि–लिंगी) अशी आहेत कारण निसर्गाचे चक्र पूर्ण करण्यासाठी दोन्ही वंश महत्वपूर्ण आहेत. मानवाला त्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी कुंटूंब अथवा समुह करणे त्याला हिताचे वाटले व त्यामुळे त्यांने आपल्या बुध्दीच्या जोरावर कुंटुंब संकल्पना अधिकच परिपुर्ण करण्याचा सतत प्रयत्न केलेला दिसुन येतो.

कुंटुंबात इंद्रियाविषयक गरजांची पुर्तता होते. कुंटुंबात जेव्हा मुल जन्माला येते तेव्हा तो हाडा मासाचा एक गोळा असतो. त्याला मानवी प्राण्यात रुपांतर होण्यासाठी समाजीकरणची प्रकिया दिर्घकालीण आहे व त्यासाठी मानवाला कुंटुंबाची अत्यंत अवश्यकता असल्याने त्याने निसर्गात ज्या वेळी आपले अस्तित्व निर्मान केले. त्याच वेळी आपल्या मुलभुत गरजांच्या पुर्ततेकरीता कुटूंबाची स्थापना केलेली दिसुन येते. आज कोणीही निश्चीत सांगु शकत नाही की पृथ्वीवर सजीव सृष्टी केव्हा, कशी आणि कशापासुन निर्मान झाली असुन तीचा किती वर्षाचा काळ आहे आणि तीची प्रगती होती की नाही ते सुध्दा सांगता येत नाही. कारण कालांतराने सजीव सृष्टी ने निसर्गा बरोबर बदल स्विकारुन आपले अस्तित्व कायम टिकवले आहे.

सुखी व समाधानी जीवन जगण्यासाठी मानसिक व शरिरीक सुरक्षा प्रदान करुन देणे हे कुंटुंब संस्थंचे उध्दीष्टे आहे. कुंटुंब संस्थेला हे उध्दीष्टे साध्य करता यावे या साठी कुंटुंब संस्थेच्या परस्पर संबधाचे स्वरुप सुनिश्चीत झालेले असते. " कुंटुंबाच्या निर्मितीचे समाजमान्य साधन म्हणजे लग्न होय. प्रथम स्त्री–पुरुषांचा परस्परांशी विवाह होतो नंतर त्यांना मुले होतात. तेव्हा ते पती–पत्नी (माता–पिता) व त्यांची मुले यांचे मिळुन कुंटुंब अस्तित्वात येते. मानवाच्या अनेक विविध गरजा वाढत जातात त्या पुर्ण करण्यासाठी परपरागत व्यवसायातुन नवीन व्यवसाय शोधुन काढले या व्यवसायमार्गातुन रानटी अवस्थेकडुन मानवी अवस्था केंव्हा अवगत केली हे मानवाला कळले नाही शेती सारख्या परपंरागत व्यवसायाला मागे टाकुन नवीन वळनावरी येवून औद्योगीककरणाचा पाया रचत पुढे गेला.

त्या व्यवसायातुन आपली काळानुरुप प्रगती केलेली दिसुन येते. या व्यवसायात प्रथम प्राथमीक उद्‌योग स्थापन करण्यात आले. याच जाणीवेतुन पुढील जिवणाच्या गरजा पुर्ण करण्यासाठी दुय्यम व तृतीयक उद्योगाची स्थापना करण्यात आली आहे. आज घडीला तर चतुर्थ व पंचम उद्योगाची सुरुवात झाली आहे. यातुन मानवी स्वार्थ वाढत गेला व औद्योगीकरणामुळे संपुर्ण जगात स्पर्धा निर्माण केली आहे. या स्पर्धेमुळे समाजात दोन वर्ग निर्माणझाले आहेत. एक कामगार वर्ग व दुसरा भांडवलदार वर्ग आहे. या दोन वर्गाने समाजात मोठ्या प्रमाणात उलथा – पालथ झाली आहे. यातुन आपला उद्दश पुर्ण करण्यासाठी स्वार्स्थ वाढला आहे. त्यामुळे विविध समस्या निर्माणझाल्या विशेष म्हणजे समाजातील अनेक समस्या या कौटुंबीक आहेत. कुटूंबातील काही सदस्याच्या वाईट वर्तनामुळे अनेक समस्या निर्माण झाल्यात म्हणुनच औद्योगीक समाजातील बहुतांश समस्या एक तर कौटुंबिक आहेत नाहीतर त्या कुंटुंब संस्थेच्या संरक्षणात्मक व प्रकार्यात्मक बदलातुन निर्माण झाल्या आहेत. या सर्व समस्यांना कौटुंबिक समस्या असे म्हणतात. यात हुंड्याची समस्या, घटस्फोट, स्त्रीयांना कमी लेखुन घरगुती हिंसा, वृधांच्या समस्या इत्यादी. या सर्व समस्या कुंटुंबाशी संबंधीत आहेत.

हया समस्या मध्ययुगीन व आधूनिक काळात जास्तच निर्माण होतांना दिसुन येते. पण प्राचीन काळी या समस्यांना कुंटुंबात कोणतेच स्थान नव्हते. त्याकाळी ज्या समस्या होत्या त्यात मुलभुत गरजापूर्ण करणे हीच मोठी समस्या होती.मानवी समुहाने प्रगती करण्यास सुरुवात झाली. आज कौटुबिंक औद्योगीक समाजात काही व्यक्तीतर अन्याय झाल्याणे त्यांना विवि समस्यांना सामोरे जावे लागत आहे.कौटुंबिक औद्योगीक समाजामुळे खालील प्रमाणे समस्या निर्माण झालेल्या दिसुन येतात.

**(01) हुंडा :**

कुंटुंबाच्या प्रगतीसाठी समाजाने उदयोग स्थापन केले पण उदयोग उभारण्यासाठी लागणारे भांडवल आनायचे कुठुन हि समस्या निर्माण झाली व त्यामुळे विवाहित स्त्रिला हुंडाच्या नावाखाली असे छोटे, मोठे उदयोग उभेकरण्यासाठी पैश्याची मागणी होवू लागली व त्यातुन हुंडयाची समस्या अधिकच बिकट झाली.

**(02) विभक्त कूटुंब पध्दती:**

औदयोगिकरणामुळे संयुक्त कुटुंब पध्दती ऱ्हाय होवून विभक्त कुंटुंब पध्दती प्रचलित झाली. यातुन कौंटूबिक समस्या निर्माण झाल्या याचा परिणाम म्हणुन व्यक्ती मध्ये औपचारिक संबंध निर्माण होवून व्यक्ती–व्यक्तीचा प्रत्यक्ष संबंध सपुष्ठात येवून गरजेपूर्ता संबंध तयार झाला आहे. त्यामुळे समाजातील रुठी, प्रथा, परंपरांचा ऱ्हास होत आहे.

**(03) घटस्फोट (Divorce):**

औद्योगीकरणाच्या झपाट्याने मनुष्यातील माणूसकीही कमी झाली आहे, त्याचा परिपाक म्हणून घटस्फोटचे प्रमाण वाढत आहे कारण औदयोगीक कूशलता असलेल्या व्यक्ती मध्ये अहंभाव मोठया प्रमाणत निर्माण झाला आहे. यात 'मी' पणा अधिक दृढ घेत असलयामुळे दुसऱ्याच्या स्वतंत्र्याची गळचेपी केली जात आहे. याच करणाने समाजात घटस्फोट होताना दिसून येत आहेत.

**(04) झोपडपट्टीत वाढ :**

ग्रामीण समाजात पारंपारिक व्यवसायामुळे नविन रोजगार निर्मिती होत नसल्याने त्याच बरोबर विविध सुख–सुविधा या भागात नसल्याने ग्रामीण समुहयातील व्यक्तीचे शहरी भागात औद्योगिक वसाहतीकडे स्थलांतर होत आहे. या भागात लोकांची गर्दी झाल्याने त्याप्रमाणात उद्‌योग या लोकांना रोजगार पूरवू शकत नाही. याचा परीणाम म्हणून वेतनात कपात, कामांच्या तासात वाढ, कामाच्या ठिकाणी सुख–सुविधाचा अभाव झाला आहे. यातुनच या भागात मोठया प्रमाणावर झोपडपट्टी व गलिच्छ वस्त्या निर्माण झाल्याने अनेक आरोग्याचे प्रश्न वर तोंड काढत आहे. उदा : मुंबईतील–धारावी, औरंगाबाद–वाळूज.

**(05) बालगुन्हेगारी :**

वाढत्या औद्योगिक समाजामुळे कुंटुंबात समाजात बालगुन्हेगारी वाढत आहे कारण आधिक अधिक गरजाची पूर्तता करण्यासाठी आई–वडिल अधिकच काम करत असल्याने कुंटुंबासाठी वेळ पण देवु शकत नाहित म्हणून हि समस्या अधिकच बिकट झाली आहे.

**(06) बालकामगारात वाढः**

वाढती महागाई व चैनिच्या वस्तूची हौस पुरवण्यासाठी वेतन कमी पडत असल्याने लहान मुलानां सूध्दा विविध कामावर पाठवल्या जाते, यातून बालकामगार समस्या तीव्र झाली आहे.

**(07)करार विवाहात वाढ :**

उद्योगाच्या ताण–तणावात आणि कुंटुंबाची जबाबदारी पेलता येत नसल्याने तरुण – तरुणी करार विवाह पसंद करत आहेत. एकमेकांच्या कामाचा ताण, विचाराचा प्रवाह वेगवेगळा असल्याने, संस्कृतीतील बदल, जातीतील विविधता असल्याने इत्यादी कारणामुळे करार विवाहात वाढ होत आहे व या विवाहात संततीस स्थान नाही.

**(08) वृध्दांच्या समस्या :**

औद्योगीक समाजामध्ये सर्व घटकांची उपलब्धता कमी असल्याने वृध्दांच्या समस्येत वाढ होत आहे, कारण या समाजात विभक्त कुंटुंबाला प्राधान्य दिले आहे. आई–वडिलांचे आरोग्य व पालन–पोषणावरिल खर्च पूर्ण करता येत नसल्याने त्यांना इतरत्र सोडल्या जावे.

(09) स्त्रींचा दर्जा व भूमिका :

औद्योगीक समाजातील कुंटुंबात महिलांची भूमिका महत्वपूर्ण मानली जाते. कारण पती च्या, कुंटुंब प्रमुखाच्या एकट्या उत्पन्नात गरजा पुर्ण होत नसल्याने महिलांना सुध्दा काम करावे लागते म्हणून कुटूंबाच्या उत्पन्नात स्त्रींयाची भूमिका बरोबराची मानली जाते मात्र तिला दर्जा दिला जात नाही.सामाजीक पंरपेरा अथवा संस्कृती म्हणून कोणत्याही कार्यात स्त्रियांना दर्जा हा दुय्यम दिला जातो.

(10) शैक्षणिक समस्या :

औद्योगीक समाजातील कुंटुंबात कामामुळे स्थलांतर अधिक प्रमाणात आहे. त्यामुळे त्यांचा मुलांचा शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. औद्योगीक वसाहतीला कूशल कामगार वर्ग लागतो. पण उद्योगाच्या ठिकाणी व्यवहारिक शैक्षणिक संकुले उपलब्ध नसल्याने मुले शिक्षणामुळे वंचित राहतात.

**सारांश :**

पृथ्वीवर सजीव सृष्टी मध्ये मानव हा प्राणी बुध्दिजीव असल्याने त्यांने त्याच्या शारिरिक आणि इंद्रयविषयक गरजेतून कुंटुंबाची निर्मिती केली आहे. या गरजपूर्तेसाठी मानवाने समुह किंवा समाज तयार करुन अधिकाधिक गरजांच्या पूर्तीसाठी उद्योग निर्माण केले आहेत असे दिसून येते पण उदयोगांचे केंद्रिकरण झालेले दिसून येते याच केंद्रिकरणात कुंटुंबात व समाजात विविध समस्या निर्माण झाल्याचे निष्पन्न झाल्या आहेत. कौटुंबिक व औदयोगिक समाजात ज्या काही समस्या उत्पन्न झाल्या आहेत त्या मात्र कुंटुंबातुनच उत्पन्न झालेले दिसून येतात त्यात प्रामुख्याने बालकामगार, बालगुन्हेगारी, वृध्दांच्यासमस्या, झोपडपट्टी आणि करार विवाह पध्दती इत्यादींत वाढ दिवसेनदिवस वाढ होत असल्याने समाजात रुद्र रुप धारण करीत आहेत. त्यामुळे व्यक्ती–व्यक्तीचे संबंध दुरावत चालले आहेत. हे समाजासाठी घातक आहे.

**संदर्भग्रंथ :–**


1) मदन, जी.आर. 1995. विकास का समाजशास्त्र. दिल्ली : विवेक प्रकाशन.
2) आगलावे, प्रदिप. 2015. भारतीय समाज प्रश्न आणि समस्या. नागपुर : श्री साईनाथ प्रकाशन
3) कुलकर्णी, पी.के. 2000. सामान्य समाजशास्त्र. नागपूर : श्री मंगेश प्रकाशन.
4) रिपोर्ट ऑफ दी इंडियन इंडास्ट्रियल कमिशन.
5) चिरडे, बालाजी.2006. भारतीय इतिहासातील स्त्रीया. नांदेड : निर्मल प्रकाशन.
6) लोटे, रा.ज. 2015. भारतीय समाज आव्हाने आणि समस्या. नागपुर : पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स.
7) शहा घनश्याम. 2004. भारतातील सामाजिक चळवळी. नवी दिल्ली : सागे प्रकाशन

**Excel Publication House, Aurangabad**

Plot No:-1/9/50-P Jaisingpura Near University,
Aurangabad – 431001, Maharashtra, India.
Mobile: 9921555069, 9545162848
E-mail: contact@excelpublication.com **www.excelpublication.com**